**राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवाल खंड-२ मधील वेतनश्रेण्यांविषयक व आनुषंगिक शिफारशी स्वीकृत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०२३

<u>वाचा</u> :- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२१६/प्र.क्र.५८/सेवा-९, दि. १७ जानेवारी, २०१७
(२) शासन निर्णय,वित्त् विभाग क्रमांक : वेपुर-२०१८/प्र.क्र. ४४/सेवा-९, दि. ०१. जानेवारी, २०१९
(३) शासन अधिसुचना, वित्त विभाग क्रमांक : वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि. ३० जानेवारी, २०१९
(४) शासन अधिसुचना, वित्त विभाग क्रमांक : वेपुर-११२०/प्र.क्र.९/सेवा-९, दि. ३० एप्रिल, २०२१
(५) शासन अधिसुचना, वित्त विभाग क्रमांक : वेपुर-१११९/प्र.क्र.२९/सेवा-९, दि. २८ एप्रिल, २०२२

**<u>प्रस्तावना :-</u>**

केंद्र शासनाने केंद्रिय ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्यांत दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला होता. केंद्र शासनाच्या निर्णयांच्या आधारे राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्यांत सुधारणा करण्याच्या दुष्टीने शिफारशी करण्यासाठी वाचा क्रमांक (१) अन्वये श्री. के. पी बक्षी, सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन करण्यात आली होती. प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग हे या समितीचे सदस्य होते. समितीने आपला अहवाल खंड-१ शासनास दि. ५ डिसेंबर, २०१८ रोजी सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशी वाचा क्रमांक (२) येथील शासन निर्णयान्वये स्वीकृत करण्यात आल्या आहेत. राज्य वेतन सुधारणा समितीने अहवाल खंड-२ शासनास दि. ८ फेब्रुवारी, २०२१ रोजी सुधारणेसह सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशींवर निर्णय घेण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत सदर अहवाल मा. मंत्रीमंडळापुढे सादर करण्यात आला होता. मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय** :-

शासनाने राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या अहवालाच्या खंड -२ मधील शिफारशीं संदर्भात निर्णय घेतले आहेत. समितीच्या शिफारशी व त्यावर शासनाने घेतलेले निर्णय याबाबतचा तपशिल सोबतच्या जोडपत्र - १ व जोडपत्र - २ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०२१३१२१३३९४७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashish Kumar Singh
Date: 2023.02.13 12:18:03 +05'30'

**( आशिषकुमार सिंह )**
अप्पर मुख्य सचिव (ले. व को.) वित्त विभाग,

**प्रति,**

| | |
|---|---|
| राज्यपालांचे सचिव<br>मुख्यमंत्री यांचे सचिव<br>अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव<br>सभापती/ उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव<br>सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता<br>सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.<br>#सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.<br># सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.<br>#प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br># आयुक्त राज्य माहिती आयोग, (सर्व)<br># सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई.<br># प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औंरगाबाद.<br>राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.<br>सर्व विभागीय आयुक्त.<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवान, पुणे | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद.<br>मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका<br>कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी / देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर.<br>कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर<br>कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी<br>कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला<br>कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.<br>कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, नागपूर.<br>कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.<br>कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद<br>कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड<br>कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती<br>कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई |

(वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ सोबतचे जोडपत्र)

**जोडपत्र क्रमांक-१**

| **अहवालातील भाग** | **शिफारशींचा गोषवारा** | **शासनाने घेतलेला निर्णय** |
|---|---|---|
| **प्रकरण क्रमांक ८**<br><br>**भाग अ** | “समितीच्या विचारार्थ असलेल्या सर्व संवर्गांच्या वेतन संरचनेसंबंधीच्या मागण्यांबाबत समितीने विचार करुन तीच्या अहवालातील एकूण १०४ संवर्गांच्या बाबतीत शिफारशी केल्या आहेत. उर्वरित इतर सर्व संवर्गांच्या वेतन संरचनेसंदर्भात समितीची कोणतीही शिफारस नाही.”<br><br>वर नमूद केलेले सुधारित वेतन स्तर दि. १ जानेवारी, २०१६ पासून काल्पनिकरित्या मंजूर करण्यात यावेत आणि प्रत्यक्ष आर्थिक लाभ या संबंधीचे शासन आदेश ज्या महिन्यात निर्गमित होतील त्या महिन्याच्या १ तारखेपासून देण्याची समिती शिफारस करीत आहे. मात्र दि. १ जानेवारी, २०१६ पासून आदेश निर्गमित होण्याच्या महिन्यापर्यंत कुठल्याही संवर्गाला वरील शिफारशींमुळे थकबाकी अनुज्ञेय ठरणार नाही. | स्वीकृत.<br><br>(१०४ संवर्गाची यादी विवरणपत्र-अ सोबत ) |

(वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ सोबतचे जोडपत्र-१ सोबतचे सहपत्र)

# विवरणपत्र –अ

राज्य वेतन सुधारणा समितीने केलेली शिफारस शासनाने मान्य करुन ज्या संवर्गाना सुधारित वेतन स्तर मंजूर केलेले आहेत अशा संवर्गाची माहिती दर्शविणारे विवरणपत्र.

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | ७ व्या वेतन आयोगानुसार मंजूर सुधारितवेतनस्तर (रु.) | समितीने शिफारस केलेला ७ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनस्तर (रु.) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **१. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्यव्यवसाय विभाग** | | |
| | **(१) कृषि आयुक्तालय** | | |
| **१** | संचालक / [नि.व गु.नि.] /फलोत्पादन / विस्तार व प्रशिक्षण / कृषि प्रक्रिया व कृषि उद्योग / मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन | एस-२७ : ११८५००-२१४१०० | एस-२९ : १३११००-२१६६०० |
| | **(२) पशुसंवर्धन आयुक्तालय** | | |
| **२** | पशुधन विकास अधिकारी | एस-१५ : ४१८००-१३२३०० | एस-१६ : ४४९००-१४२४०० |
| | **२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग रेशीम संचालनालय** | | |
| **३** | संचालक | एस-२५ : ७८८००-२०९२०० | एस-२६ : ८२२००-२११५०० |
| **४** | उप संचालक | एस-२० : ५६१००-१७७५०० | एस-२१ : ५७१००-१८०८०० |
| **५** | सहाय्यक संचालक | एस-१६ : ४४९००-१४२४०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **६** | रेशीम विकास अधिकारी – (श्रेणी १) | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| **७** | रेशीम विकास अधिकारी (श्रेणी-२) | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१५ : ४१८००-१३२३०० |
| **८** | ज्येष्ठ तांत्रिक सहाय्यक | एस -१० : २९२००-९२३०० | एस -११ : ३०१००-९५१०० |
| **९** | ज्येष्ठ क्षेत्र –तथा-प्रयोगशाळा सहाय्यक | एस -८ : २५५००-८११०० | एस -९ : २६४००-८३६०० |
| **१०** | प्रयोग निर्देशक | एस -७ : २१७००-६९१०० | एस -८ : २५५००-८११०० |
| **११** | क्षेत्र सहाय्यक | एस -६ : १९९००-६३२०० | एस -७ : २१७००-६९१०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | **३. वित्त विभाग विक्रीकर विभाग** | | |
| **१२** | विक्रीकर अधिकारी | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| | **४. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (१) नियंत्रक शिधावाटप** | | |
| **१३** | सहाय्यक नियंत्रक शिधावाटप | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| | **(२) नागरी पुरवठा (गोदाम व वाहतूक) संचालनालय** | | |
| **१४** | सहाय्यक संचालक | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| | **(३) पुरवठा आयुक्त** | | |
| **१५** | सहाय्यक संचालक | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **१६** | निरीक्षक अधिकारी | एस -१३ : ३५४००-११२४०० | एस -१४ : ३८६००-१२२८०० |
| | **(४) नियंत्रक वैधमापनशास्त्र** | | |
| **१७** | सहाय्यक नियंत्रक, वैधमापनशास्त्र | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **१८** | निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) | एस -१३ : ३५४००-११२४०० | एस -१४ : ३८६००-१२२८०० |
| **१९** | क्षेत्र सहाय्यक | एस -६ : १९९००-६३२०० | एस -७ : २१७००-६९१०० |
| | **(५) विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी** | | |
| **२०** | सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी | एस -१६ : ४४९००-१४२४०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| | **५. सामान्य प्रशासन विभाग (१) राज्यपालांचे सचिवालय** | | |
| **२१** | सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक | एस -८ : २५५००-८११०० | एस -९ : २६४००-८३६०० |
| **२२** | गृहपाल | एस -८ : २५५००-८११०० | एस -९ : २६४००-८३६०० |
| **२३** | खाद्यपेय सहाय्यक | एस -८ : २५५००-८११०० | एस -९ : २६४००-८३६०० |
| **२४** | जलतरण तलाव प्रशिक्षक | एस -७ : २१७००-६९१०० | एस -८ : २५५००-८११०० |
| **२५** | आचारी | एस -६ : १९९००-६३२०० | एस -८ : २५५००-८११०० |
| **२६** | सहाय्यक आचारी | एस -५ : १८०००-५६९०० | एस -७ : २१७००-६९१०० |
| **२७** | कनिष्ठ आचारी | एस -३ : १६६००-५२४०० | एस -५ : १८०००-५६९०० |
| **२८** | पॅन्ट्रीमॅन | एस -३ : १६६००-५२४०० | एस -५ : १८०००-५६९०० |

| | | | |
|---|---|---|---|
| **२९** | प्रमुख बटलर | एस -६ : १९९००-६३२०० | एस -८ : २५५००-८११०० |
| **३०** | बटलर | एस -३ : १६६००-५२४०० | एस -५ : १८०००-५६९०० |
| **३१** | सहाय्यक (खाद्यपेय) | एस -१ : १५०००-४७६०० | एस -३ : १६६००-५२४०० |
| **३२** | मुख्य माळी | एस -६ : १९९००-६३२०० | एस -८ : २५५००-८११०० |
| **३३** | माळी | एस -५ : १८०००-५६९०० | एस -७ : २१७००-६९१०० |
| | **(२) सर्व प्रशासकीय विभाग** | | |
| **३४** | वरिष्ठ स्वीय सहाय्यक | एस -२३ : ६७७००-२०८७०० | एस -२४ : ७११००-२११९०० |
| **३५** | लघुलेखक (निवडश्रेणी) | एस -१६ : ४४९००-१४२४०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **३६** | लघुलेखक (उच्चश्रेणी) | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| **३७** | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१५ : ४१८००-१३२३०० |
| | **(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग** | | |
| **३८** | कक्ष अधिकारी | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **३९** | अवर सचिव | एस -१८ : ४९१००-१५५८०० | एस -२३ : ६७७००-२०८७०० |
| **४०** | उप सचिव | एस -२३ : ६७७००-२०८७०० | एस -२५ : ७८८००-२०९२०० |
| **४१** | सहसचिव | एस -२५ : ७८८००-२०९२०० | एस -२७ : ११८५००-२१४१०० |
| | **(४) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय** | | |
| **४२** | जिल्हा माहिती अधिकारी | एस -१८ : ४९१००-१५५८०० | एस -२० : ५६१००-१७७५०० |
| **४३** | वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती) | एस -१८ : ४९१००-१५५८०० | एस -२० : ५६१००-१७७५०० |
| **४४** | वरिष्ठ उप संपादक | एस -१८ : ४९१००-१५५८०० | एस -२० : ५६१००-१७७५०० |
| **४५** | चलत् छायाचित्रकार | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **४६** | दूरदर्शन छायाचित्रकार | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **४७** | सहाय्यक चित्रपट संकलक | एस -८ : २५५००-८११०० | एस -१० : २९२००-९२३०० |
| **४८** | अंधार कोठडी परिचर | एस -१ : १५०००-४७६०० | एस -३ : १६६००-५२४०० |
| **४९** | प्रतिवेदक | एस -१० : २९२००-९२३०० | एस -१२ : ३२०००-१०१६०० |
| **५०** | उर्दू अनुवादक/अनुवादक/ स्वागतकार | एस -१० : २९२००-९२३०० | एस -१२ : ३२०००-१०१६०० |
| **५१** | सहाय्यक संचालक (माहिती)/ माहिती अधिकारी/अधीक्षक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |

| | | | |
|---|---|---|---|
| **५२** | सिने यंत्रचालक | एस -७ : २१७००-६९१०० | एस -८ : २५५००-८११०० |
| **५३** | छायाचित्रकार | एस -१० : २९२००-९२३०० | एस -१२ : ३२०००-१०१६०० |
| **५४** | उप संपादक | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| **५५** | माहिती सहाय्यक | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| | **६. गृह विभाग**<br>**(१) पोलीस महासंचालक** | | |
| **५६** | कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक | एस -७ : २१७००-६९१०० | एस -८ : २५५००-८११०० |
| **५७** | वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक | एस -८ : २५५००-८११०० | एस - ११ : ३०१००-९५१०० |
| **५८** | सहाय्यक  छायाचित्रकार | एस -८ : २५५००-८११०० | एस - ११ : ३०१००-९५१०० |
| **५९** | छायाचित्रकार | एस -१० : २९२००-९२३०० | एस -१२ : ३२०००-१०१६०० |
| **६०** | कार्यदेशक छायाचित्रकार | एस -१० : २९२००-९२३०० | एस -१३ : ३५४००-११२४०० |
| **६१** | सहाय्यक  शासकीय दस्तऐवज परिक्षक | एस -१३ : ३५४००-११२४०० | एस -१५ : ४१८००-१३२३०० |
| **६२** | शासकीय दस्तऐवज परिक्षक | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१८ : ४९१००-१५५८०० |
| **६३** | अपर मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक | एस -१६ : ४४९००-१४२४०० | एस -२० : ५६१००-१७७५०० |
| **६४** | मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक | एस -१६ : ४४९००-१४२४०० | एस -२२ : ६००००-१९०८०० |
| **६५** | पोलीस महासंचालक यांचे विधि सल्लागार | एस -२३ : ६७७००-२०८७०० | एस -२७ : ११८५००-२१४१०० |
| **६६** | विधि अधिकारी | एस -१६ : ४४९००-१४२४०० | एस -१८ : ४९१००-१५५८०० |
| | **(२) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क** | | |
| **६७** | जवान | एस-६ : १९९००-६३२०० | एस-७ : २१७००-६९१०० |
| **६८** | जवान-नि-वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | एस-७ : २१७००-६९१०० |
| **६९** | सहायक दुय्यम निरिक्षक / पेट्टी ऑफीसर | एस-७ : २१७००-६९१०० | एस-८ : २५५००-८११०० |
| **७०** | निरीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | एस-१५ : ४१८००-१३२३०० |
| **७१** | सहाय्यक आयुक्त | एस-१५ : ४१८००-१३२३०० | एस-१६ : ४४९००-१४२४०० |
| | **७. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग** | | |
| | **मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय** | | |
| **७२** | सुतार (वरिष्ठ) | एस-६ : १९९००-६३२०० | एस -८ : २५५००-८११०० |
| **७३** | सुतार | एस -५ : १८०००-५६९०० | एस -७ : २१७००-६९१०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | **८. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग** | | |
| | **वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय** | | |
| **७४** | अधिसेविका (अधिसूचना दि. ३०.०१.२०१९ मधील पृष्ठ क्र. १९० अ. क्र. ४१, ४२) | एस -१६ : ४४९००-१४२४०० | एस -१८ : ४९१००-१५५८०० |
| **७५** | अधिसेविका (अधिसूचना दि. ३०.०१.२०१९ मधील पृष्ठ क्र. १९१ अ. क्र. ७४) | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **७६** | सहाय्यक अधिसेविका | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **७७** | सार्वजनिक आरोग्य परिचारीका | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| **७८** | मानसोपचार परिचारिका | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| **७९** | बालरोग परिचारिका | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| **८०** | सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका | एस -८ : २५५००-८११०० | एस -९ : २६४००-८३६०० |
| | **९. नियोजन विभाग** | | |
| | **अर्थ व सांख्यिकी संचालनालय** | | |
| **८१** | अतिरिक्त संचालक | एस -२५ : ७८८००-२०९२०० | एस -२७ : ११८५००-२१४१०० |
| **८२** | सह संचालक | एस -२३ : ६७७००-२०८७०० | एस -२५ : ७८८००-२०९२०० |
| **८३** | उप संचालक (निवडश्रेणी) | एस -२० : ५६१००-१७७५०० | एस -२३ : ६७७००-२०८७०० |
| **८४** | संशोधन अधिकारी | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१६ :४४९००-१४२४०० |
| **८५** | अन्वेषक | एस -७ : २१७००-६९१०० | एस -८ : २५५००-८११०० |
| | **नियोजन विभाग (खुद्द)** | | |
| **८६** | ग्रंथपाल व संदर्भअधिकारी | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -२० : ५६१००-१७७५०० |
| | **१०. सार्वजनिक आरोग्य विभाग** | | |
| | **आरोग्य सेवा संचालनालय** | | |
| **८७** | शल्यचिकीत्सक | एस -२३ : ६७७००-२०८७०० | एस -२४ : ७११००-२११९०० |
| **८८** | जिल्हा आरोग्य अधिकारी | एस -२३ : ६७७००-२०८७०० | एस -२४ : ७११००-२११९०० |
| **८९** | सहाय्यक अधिसेविका | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१७ : ४७६००-१५११०० |
| **९०** | आरोग्य कार्यकर्ता / बहूउद्देशीय आरोग्य कार्यकर्ता | एस -८ : २५५००-८११०० | एस -९ : २६४००-८३६०० |
| **९१** | अधिसेविका | एस -१६ : ४४९००-१४२४०० | एस -१८ : ४९१००-१५५८०० |
| **९२** | मानसोपचार परिचारिका | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१६ :४४९००-१४२४०० |

| | | | |
|---|---|---|---|
| **९३** | सार्वजनिक आरोग्य परिचारीका | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| | **११, १२, १३. सार्वजनिक बांधकाम विभाग /जलसंपदा विभाग / मृद व जलसंधारण विभाग** | | |
| **९४** | सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| **९५** | शाखा अभियंता | एस -१५ : ४१८००-१३२३०० | एस -१६ : ४४९००-१४२४०० |
| **९६** | कनिष्ठ अभियंता | एस -१४ : ३८६००-१२२८०० | एस -१५ : ४१८००-१३२३०० |
| | **१४. महसूल व वन विभाग** | | |
| **९७** | वनपाल | एस -८ : २५५००-८११०० | एस -९ : २६४००-८३६०० |
| **९८** | वनरक्षक | एस -५ : १८०००-५६९०० | एस -७ : २१७००-६९१०० |
| | **१५. ग्राम विकास विभाग** | | |
| **९९** | विस्तार अधिकारी | एस -१३ : ३५४००-११२४०० | एस -१४ : ३८६००-१२२८०० |
| | **१६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग** | | |
| **१००** | तबलजी | एस -६ : १९९००-६३२०० | एस -८ : २५५००-८११०० |
| | **१७. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग** | | |
| **१०१** | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी | एस -१८ : ४९१००-१५५८०० | एस -२० : ५६१००-१७७५०० |
| | **१८. आदिवासी विकास विभाग** | | |
| **१०२** | अधीक्षक (पुरुष) (शासकीय व अनुदानित आश्रमशाळा) | एस -८ : २५५००-८११०० | एस -१२ : ३२०००-१०१६०० |
| **१०३** | अधीक्षक (महिला)(शासकीय व अनुदानित आश्रमशाळा) | एस -८ : २५५००-८११०० | एस -१२ : ३२०००-१०१६०० |
| | **१९. नगर विकास विभाग** | | |
| **१०४** | मुख्याधिकारी श्रेणी १ – | एस -२० : ५६१००-१७७५०० | एस -२३ : ६७७००-२०८७०० (संवर्गातील २५ % पदांना निवडश्रेणी) |
| | **२०. विधानमंडळ सचिवालय** | | |
| **१०५** | मुख्य टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | एस -८ :२५५००-८११०० |

(वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ सोबतचे जोडपत्र)

## जोडपत्र क्रमांक-२

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>समितीची शिफारस</th><th>शासनाचा निर्णय</th></tr>
<tr><td></td><td>मूळ अहवाल खंड २ -: भाग अ मधील शिफारशी -</td><td></td></tr>
<tr><td>१</td><td>गट अ मधील संवर्गांसाठी निवडश्रेणी :-<br>गट अ मधील वेतन स्तर एस-२०: रु. ५६१००-१७७५०० व त्यापुढील संवर्गांच्या पदोन्नतीमध्ये कुंठितता असल्याने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी असलेली वेतनस्तर एस-२० ची मर्यादा दूर करण्याची अधिकाऱ्यांची मागणी होती. सदर मागणीचा विचार करून अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून समिती २५% पदांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आणि त्याखालील अटीच्या अधिन राहून निवडश्रेणी वेतन स्तर मंजूर करण्याची शिफारस करित आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="2">७ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतन स्तर</th><th colspan="2">निवडश्रेणी वेतन स्तर</th></tr>
<tr><td rowspan="3">१</td><td>एस-२०</td><td>रु. ५६१००-१७७५००</td><td rowspan="3">एस-२३</td><td rowspan="3">रु. ६७७०० -२०८७००</td></tr>
<tr><td>एस-२१</td><td>रु. ५७१००-१८०८००</td></tr>
<tr><td>एस-२२</td><td>रु. ६००००-१९०८००</td></tr>
<tr><td rowspan="2">२</td><td>एस-२३</td><td>रु. ६७७००-२०८७००</td><td rowspan="2">एस-२५</td><td rowspan="2">रु. ७८८०० - २०९२००</td></tr>
<tr><td>एस-२४</td><td>रु. ७११००-२११९००</td></tr>
<tr><td>३</td><td>एस-२५</td><td>रु. ७८८००-२०९२००</td><td rowspan="2">एस-२७</td><td rowspan="2">रु. ११८५०० -२१४१००</td></tr>
<tr><td></td><td>एस-२६</td><td>रु. ८२२००-२११५००</td></tr>
</table>
वरील तक्त्यात नमूद केलेले निवडश्रेणी वेतन स्तर आणि पदोन्नतीच्या पदाचा वेतन स्तर यापैकी जो वेतन स्तर कमी असेल तो वेतन स्तर निवडश्रेणी वेतन स्तर म्हणून २५% पदांना मंजूर करण्यात यावा.<br>सद्यस्थितीत ज्या संवर्गांना २५% पेक्षा कमी प्रमाणात निवडश्रेणी मंजूर करण्यात येते, अशा संवर्गांचे निवडश्रेणीचे प्रमाण २५% इतके करण्यात यावे. तसेच ज्या संवर्गांची संवर्ग संख्या किमान ४ इतकी आहे, अशा संवर्गांनाच निवडश्रेणी लागू होईल. ज्या संवर्गांना यापूर्वीच्या शासन निर्णयांन्वये संवर्ग संख्येच्या २५% पेक्षा अधिक पदांना निवडश्रेणी अनुज्ञेय केली आहे ती यापुढेही अबाधित राहील.</td><td>स्वीकृत.<br>सामान्य प्रशासन विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | निवडश्रेणी वेतन स्तर मंजूर करण्यासंबंधीची कार्यपध्दती आणि पात्रतेच्या अटी तसेच इतर तपशिल सामान्य प्रशासन विभागाने निश्चित करावा. या संदर्भातील धोरणात्मक आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून ज्या दिनांकास निर्गमित होतील त्या दिनांकापासून निवडश्रेणी लागू होईल. तद्नंतर संबंधित प्रशासकीय विभागांनी सामान्य प्रशासन विभागाशी विचार-विनिमय करुन याबाबतचे आदेश निर्गमित करावेत. | |
| २ | जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहाय्यक या संवर्गास महसूल विभागातील अव्वल कारकून संवर्गाप्रमाणे वेतन स्तर एस-१२: रु. ३२०००-१०१६०० मंजूर करण्याची मागणी मा. विधान परिषदेच्या विनंती अर्ज समितीपुढे उपस्थित करण्यात आली होती. मा. विनंती अर्ज समितीच्या सूचनेवरुन ही बाब राज्य वेतन सुधारणा समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती. या अनुषंगाने राज्य वेतन सुधारणा समितीने महसूल विभागातील अव्वल कारकून आणि जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहाय्यक या दोन्ही पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचा तौलनिक अभ्यास केला असून जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ सहायकांना महसूल विभागातील अव्वल कारकून संवर्गाप्रमाणे वेतन स्तर देणे उचित ठरणार नाही, असे समितीचे मत आहे. | स्वीकृत.<br>यासंदर्भात मा.मंत्रिमडंळाचा निर्णय मा. विनंती अर्ज विधान परिषद समितीस अवगत करण्यात येईल. |
| ३ | समितीकडे वेतनवृध्दीच्या मागण्या म्हणून प्राप्त झालेल्या काही प्रस्तावांमध्ये संवर्गांचे विलिनीकरण करुन वेतनवृध्दी करण्याची मागणी करण्यात आली आहे. गुणवत्तेच्या आधारे संवर्गाच्या वेतनवृध्दीची मागणी करणे आणि वेतनवृध्दीसाठी संवर्गांचे विलिनीकरण करणे आणि प्रशासकीय संरचना बदलणे या दोन भिन्न बाबी आहेत. याबाबत समितीचे असे मत आहे की, संवर्गांचे विलिनीकरण हे वेतनवृध्दीसाठी न करता ते प्रशासकीय गरज असेल तरच करावे. याबाबत प्रशासकीय विभागाचा आकृतिबंध निश्चित करताना साकल्याने विचार करणे इष्ट ठरेल. त्यामुळे समितीने अशा प्रस्तावांबाबत समितीने कोणतीही शिफारस केलेली नाही. | स्वीकृत. |

| | **मूळ अहवाल खंड २ -: भाग - २ मधील शिफारशी** | |
|---|---|---|
| ४ | विधि व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील पदांना ६ व्या वेतन आयोगात मंजूर केलेले विशेष वेतन विचारात घेऊन समिती पुढे नमूद केलेल्या पदांना ७ व्या वेतन आयोगात खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विशेष वेतन मंजूर करण्याची शिफारस करीत आहे. | **स्वीकृत** |

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान विशेष वेतन (रू.) | शिफारस करण्यात येत असलेले सुधारित विशेष वेतन (रु.) |
|---|---|---|---|
| १ | प्रधान सचिव (विधि विधान) | २४०० | २९०० |
| २ | सचिव (विधि विधान) | २००० | २४०० |
| ३ | प्रारुपकार-नि-सह सचिव | १७४० | २१०० |
| ४ | उप प्रारुपकार-नि-उप सचिव | १५२० | १८०० |
| ५ | सहायक प्रारुपकार-नि-अवर सचिव | १३२० | १६०० |
| ६ | कनिष्ठ प्रारुपकार | १०८० | १३०० |

वर नमूद केल्याप्रमाणे सुधारित विशेष वेतन हे ६ व्या वेतन आयोगात या पदांना अनुज्ञेय असलेल्या विशेष वेतनामध्ये साधारणत: २० % वाढ विचारत घेऊन शिफारस करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| ५ | गृह विभागातील पोलीस महासंचालक, तसेच नागरी संरक्षण संचालनालयाच्या अधिनस्त पुढे नमूद केलेल्या पदांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विशेष वेतन मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे. | अनुक्रमांक २ ते ६ स्वीकृत.<br><br>(अ. क्र. १ येथील पोलीस नाईक संवर्गाच्या विशेष वेतनाबाबत दिनांक ३० एप्रिल, २०२१ अन्वये अधिसूचना निर्गमित करुन कार्यवाही केलेली आहे. ) |

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान विशेष वेतन (रु) | शिफारस करण्यात येत असलेले सुधारित विशेष वेतन (रु.) |
|---|---|---|---|
| | **पोलीस महासंचालक,** | | |
| १ | पोलीस नाईक | ४८० | ७२० |
| २ | पोलीस नाईक चालक (मो. प) | २०० | ३०० |
| ३ | पोलीस नाईक (तांत्रिक) (मो. प) | २०० | ३०० |
| ४ | पोलीस नाईक भांडार (मो. प) | २०० | ३०० |
| | **नागरी संरक्षण संचालनालय** | | |
| ५ | अग्निशामन / प्रमुख विमोचक | ४०० | ६०० |
| ६ | अग्निशामक / प्रमुख विमोचक | ३८० | ५७० |

| | | |
|---|---|---|
| ६ | **शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील मुख्याध्यापक या संवर्गाच्या ६ व्या वेतन आयोगातील वेतनबँड पीबी-२ : रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु. ४७०० या वेतन संरचनेस ७ व्या वेतन आयोगात समरुप वेतन स्तर विहित करणे.**<br><br>७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने समितीने सादर केलेल्या अहवालाच्या खंड - १ मध्ये वेतन स्तर विहित करताना वेतनबँड पीबी -२: रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु. ४७०० या वेतन संरचनेस समकक्ष वेतन स्तर विहित करण्यात आलेला नाही. सदर वेतन संरचना वेतनबँड पीबी - २: रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु. ४८०० या व वेतन संरचनेत विलिन करण्याची शिफारस करण्यात येत आहे. त्यामुळे सदर वेतन संरचनेस एस-१७: रु. ४७६००-१५११०० हा वेतन स्तर अनुज्ञेय होईल. | स्वीकृत. |
| ७ | **(अ)** राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांकरिता सुधारित वेतनश्रेण्यांची शिफारस करताना केंद्र शासन आणि राज्य शासनाकडे ६ व्या वेतन आयोगातील ज्या वेतनसंरचना समान आहेत, त्यांच्याकरिता समितीने केंद्र शासनाकडील वेतन मॅट्रिक्स विचारात घेतले आहेत व त्यानुसार अहवालाच्या खंड - १ मध्ये सुधारित वेतन स्तरांची शिफारस केली आहे. त्यानुसार वेतनबँड पीबी -४: रु. ३७४००-६७००० + ग्रेड वेतन रु. ८७०० या वेतन संरचनेस केंद्र शासनाकडील वेतन स्तर (Level) - १३: रु. १,१८,५००-२,१४,१०० या वेतन स्तराची शिफारस केली आहे.<br>केंद्र शासनाने स्तर - १३ मध्ये दि. २८ सप्टेंबर २०१७ च्या आदेशान्वये सुधारणा करून स्तर- १३: रु. १,२३, १०० ते २,१५,९०० असा विहित केला आहे. सदर बाब विचारात घेता वेतनबँड पीबी -४: रु. ३७४००-६७००० + ग्रेड वेतन रु. ८७०० या वेतन संरचनेस ग्रेड वेतनास एस-२७ या संरचनेसाठी अहवालाच्या खंड-१ मध्ये शिफारस केलेल्या वेतन स्तर एस - २७: रु. ११८५००-२१४१०० मध्ये रु. १२३१००-२१५९०० अशी सुधारणा करण्याची समिती शिफारस करीत आहे.<br><br>**(ब)** समितीने अहवालच्या खंड-१ मध्ये सुधारित वेतन संरचना दि. १ जानेवारी, २०१६ पासून लागू करण्याची शिफारस केली आहे. तसेच गृह विभागातील पोलीस संवर्गाना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित दराने विशेष वेतन मंजूर केले | **(अ)** स्वीकृत.<br><br>(केंद्र शासनाच्या आदेशाच्या अनुषंगाने मा. राज्यपाल महोदय यांच्या मान्यतेनुसार दिनांक २८.०४.२०२२ रोजी अधिसूचना निर्गमित करुन कार्यवाही करण्यात आली आहे.)<br><br>**(ब)** स्वीकृत. |

| | | |
|---|---|---|
| | आहे, या बाबी विचारात घेता समितीच्या वरील अनुक्रमांक (१) ते (३) (म्हणजेच या विवरणपत्रातील अनुक्रमांक ४,५, ६ व ७) येथील शिफारशी दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून लागू करण्याची समिती शिफारस करीत आहे. | |
| **८** | **उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विद्यापीठांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन संरचनेबाबत**<br>राज्य वेतन सुधारणा समितीने आपल्या अहवालाच्या खंड-१ मध्ये विद्यापीठांतील शिक्षकेतर पदांच्या वेतनश्रेणीमध्ये झालेल्या अनियमितता विचारात घेऊन या प्रकरणाची विशेष तपासणी पथकाद्वारे तपासणी करण्यात यावी, अशी शिफारस केली होती. या शिफारशीनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत केलेले नाही. त्यामुळे समितीने सदर पदांबाबत शिफारशी केलेल्या नाहीत. | शिफारशीसी सहमत आहे. |